# ३ भारतीय चित्रकला

## १. लघुचित्र शैली

### राजस्थानी लघुचित्र शैली

इ.स. १५ व १६ व्या शतकात राजस्थानातील जोधपूर, उदयपूर, बुंदी, कोटा, बिकानेर इत्यादी लहान राजपूत राज्यांमधून एका वैशिष्ट्यपूर्ण चित्रशैलीचा प्रारंभ झाला. ती शैली राजस्थानी शैली या नावाने प्रसिद्ध झाली. राजपूत राजे आपल्या दरबारी चित्रकार ठेवत असत. त्यांच्याकडून आपल्या आवडीनुसार चित्र निर्मिती करून घेत. त्यांचेच अनुकरण करून पुढे राज्याचे प्रधान, सरदार व राज्यांतील श्रीमंत लोक यांनीही आपल्या पदरी चित्रकार ठेवले. या पद्धतीमुळे या शैलीमध्ये दोन प्रकारची चित्र निर्मिती झाली.

(१) राजदरबारी चित्रकारांची उच्च दर्जाची चित्रे

(२) सामान्य चित्रकारांची कमी दर्जाची चित्रे. यातील दरबारी चित्रकारांना सर्व सुखसोयी होत्या, त्यांना इतर राज्यांकडून भेट रूपाने आलेले उत्कृष्ट चित्र नमुने बघावयास मिळत असत. त्यामुळे या चित्रांचा दर्जा व त्यात सफाईदारपणा अधिक आहे. त्याउलट सामान्य चित्रकारांची चित्रे कमी दर्जाची असून त्यात साधे सरळ चित्रण व लोककलेचे स्वरूप होते. कारण या चित्रकारांना फारशा सुखसोयी नव्हत्या. या दोन्ही प्रकारांपैकी राजदरबारी चित्रे मुसलमानी आक्रमण आणि आपापसातील युद्धांमुळे नष्ट झाली. परिणामी राजस्थानी शैलीतील आज शिल्लक राहिलेली चित्रे ही दुसऱ्या प्रकारातील म्हणजेच सामान्य दर्जाची आहेत.

राजस्थानात याच काळात धार्मिक व सामाजिक परिवर्तन झाले. त्यात कबीर, तुलसीदास, चैतन्य, मीराबाई, सूरदास इत्यादी अनेक संत होऊन गेले. त्यांच्या भक्तिवाङ्‌मयाचा प्रसार राजस्थानात झाला. राधा-कृष्ण आणि वैष्णव भक्तिसंप्रदाय यांवर अनेक काव्यसंग्रह लिहिले गेले. त्या काव्यसंग्रहांच्या सजावटीसाठी प्रसंगानुसार अशी चित्रनिर्मिती करण्यात आली. रामायण, महाभारत, गीतगोविंद, भागवत पुराण इत्यादी ग्रंथांबरोबर भारतीय संगीतावर आधारित 'रागमाला' चित्रे, सर्व ऋतुंचे महत्त्व विशद करणारे 'ऋतुचक्र' ही चित्रमाला, बारा महिन्यांवर आधारित 'बारामास' चित्रे, अशा विविध विषयांवर या शैलीत चित्रनिर्मिती झाली. या चित्रांमध्ये तत्कालीन लोकजीवन, धार्मिक रूढी व परंपरा यांचे प्रतिबिंब पहावयास मिळते. राजस्थानी चित्रशैलीत काव्यातील कोमलता, प्रतिमा व कल्पना-विलास यांचे रम्य व मनोवेधक दर्शन घडते. या शैलीत शुद्ध व तेजस्वी जलरंगांचा वापर आढळतो. मुख्य विषयाची भिन्न भिन्न पातळीवर गटवार विभागणी करून मांडणी केलेली आढळते. गडद रंगाच्या पार्श्वभूमीवर प्रवाही व जोरदार रेखांकनाद्वारे मानवाकृती व त्यांच्या लयबद्ध हालचालींचे प्रभावी चित्रण केलेले आहे. स्त्री-पुरुषांच्या आकृत्या काहीशा ठेंगण्या असल्या तरी मोहक व सुंदर आहेत. विशाल मत्स्याकृती डोळे, उंच कपाळ, धारदार नाजूक नाक, लांब हात, लयबद्ध व नाजूक हालचाली व त्यातून व्यक्त होणारा भावनेचा उत्कृष्ट आविष्कार उल्लेखनीय आहे. या चित्रांमधून राजस्थानातील सुखी व समृद्ध जीवन बघावयास मिळते.

### राजस्थानी शैलीची वैशिष्ट्ये

राजपूत चित्रशैलीत काव्यातील कोमलता व पुराणातील धार्मिकता दिसून येते. टवटवीत रंग व ओघवती जोमदार रेषा हे या शैलीचे वैशिष्ट्य आहे. या चित्रशैलीतील चित्रे मुख्यतः आनंददायक वाटतात.

समृद्धी हे हिचे वैशिष्ट्य. कमळांनी भरलेली सरोवरे, काळ्या आकाश मेघांना उधळून टाकणाऱ्या सर्पाकृती विद्युतरेखा, पक्षी आणि फुलाफळांनी बहरलेले बगीचे, हरणे, मोर आणि बगळ्यांच्या रांगा, दीपमाला, दासदासी आणि राजपूत शैलीतील दुर्ग, प्रासाद मंदिरे, सामान्य घरातील चौक, पडव्या असे समृद्ध जीवन या चित्रांतून व्यक्त झाले आहे. राजस्थानी स्त्रियांच्या रंगीबेरंगी पोषाखांनी ही चित्रे नटलेली आहेत.

त्यांचे विशाल नेत्र, अजानबाहु, नारी सौंदर्य यांनी ती नटली आहेत. रामायण, महाभारत, मतिराम केशव, देवबिहारी, पद्मावत आणि मीरेचे कवन यातील काव्यकल्पना, रागरागिण्या, ऋतुवर्णन आणि बारामास या सर्व काव्य विषयांना राजपूत चित्रकारांनी चित्रस्वरूप दिले आहे.



राजस्थानी शैली : अश्वारुढ योद्धा

## मोगल लघुचित्र शैली

### पार्श्वभूमी

मोगलांच्या राजसत्तेमुळे भारतीय चित्रकलेत एक नवे पर्व सुरू झाले. मोगल राजांनी भारतात प्रवेश करताना इराणमधील कलावंत बरोबर आणले होते. या इराणी शैलीचा भारतीय कलेवर परिणाम होऊन मोगल



अकबरकालीन चित्रकला

चित्र शैली निर्माण झाली. मोगल सम्राटापैकी बाबर व त्याचा मुलगा हुमायून या दोन्ही सम्राटांना चित्रकलेची आवड होती. पण राज्य स्थिर करण्याच्या उलाढालीत चित्रकलेच्या विकासाकडे त्यांना लक्ष पुरवता आले नाही. हुमायूनचा मुलगा अकबर याच्या कारकिर्दीत मात्र चित्रकलेच्या विकासाला खरा आरंभ झाला.

### अकबरकालीन चित्रकला (इ.स. १५५६ ते इ.स. १६०५)

अकबराने मोगल चित्रकलेचा पाया घातला. तो उदारमतवादी व कलाप्रेमी राजा होता. हिंदू आणि मुसलमान या दोन्ही जमातीतील चित्रकारांना त्याने आपल्या दरबारात आश्रय दिला. शंभराहून अधिक चित्रकार त्याच्या दरबारी होते.

ते निसर्ग चित्रणाच्या बाबतीत प्रवीण होते. इराणी चित्रकार बाह्य सौंदर्याचे चित्रीकरण करण्यात श्रेष्ठ होते, तर भारतातील चित्रकार अंतःर्गत सौंदर्याचे दर्शन घडवण्यात श्रेष्ठ होते. इराणी चित्रशैलीत उत्तम भावनाविष्कार होता. या दोन्हीचा मिलाफ मोगल शैलीत झाला.

### ग्रंथसजावट

अकबराच्या काळात सचित्र ग्रंथ आणि व्यक्तिचित्रे निर्माण झाली. सचित्र ग्रंथनिर्मितीच्या बाबतीत इराणी चित्रकार अधिक कुशल होते. एकाच ग्रंथावर तीन चित्रकार काम करीत. एक लिखाण लिही, दुसरा चित्र काढी, तर तिसरा रंगकाम करी. त्यामुळे अक्षरलेखन, चित्रांची मांडणी अणि रंगसंगती तिन्ही बाबतीत इराणी सचित्र ग्रंथाचा दर्जा उच्च प्रतीचा असे. अकबराच्या ग्रंथालयात चोवीस हजारांहून अधिक हस्तलिखित ग्रंथ चित्रबद्ध करण्यात आले होते. हिंदूंच्या अनेक धार्मिक ग्रंथांचाही त्यात समावेश होता. शाहनामा, अकबरनामा, राज्यनामा (महाभारताचा अनुवाद), अयारदानिश (पंचतंत्राचा अनुवाद), हरिवंश, योग वासिष्ठ्य, कथासरितसागर वगैरे ग्रंथ या संग्रहात होते.

### व्यक्तिचित्रे

अकबराने व्यक्तिचित्रे काढण्यास प्रोत्साहन दिले. व्यक्तिचित्रणासाठी तो स्वतः चित्रकारापुढे बसत असे व दरबारातील इतर व्यक्तींनाही बसावयास लावी. एखाद्या व्यक्तीचे हुबेहूब साम्य आणण्याचा प्रयत्न यामुळे चित्रकार करू लागले. त्यामुळे वास्तववादी चित्रणाचा त्यांच्या अभ्यास वाढला. अकबराच्या काळात पाश्चिमात्य देशातील चित्रकारांनी काढलेली चित्रे दरबारात घेऊन येत व त्या चित्रांच्या परिणामामुळे छायाप्रकाशाचा थोडासा आभास व सूक्ष्मछटा दाखवण्याचा प्रयत्न मोगलकालीन कलावंत करू लागले.



अकबरकालीन व्यक्तिचित्र

अकबराच्या काळात अनेक चित्रांवर दोन चित्रकारांचे चित्रकाम दिसून येते. त्यातील एक चित्रकार तऱ्हा म्हणजे रेखाटन करी व दुसरा अंमल म्हणजे रंगकाम करी. अकबराच्या दरबारात अनेक चित्रकार प्रसिद्ध पावले होते. त्यातील काहींची नावे पुढीलप्रमाणे आहेत. दासवत, बसवत, केशव, लाल, मुकुंद, मुकीन, फरुखबेग मार्थी वगैरे चित्रकारांची नावे अकबरकालीन चित्रांच्या मागे कारकुनांनी लिहून ठेवलेली आढळतात. त्यावरून एकाच चित्रावर अनेक चित्रकार काम करीत असत, हे सिद्ध झाले आहे.

### जहांगीरकालीन चित्रकला
### (इ.स. १६०५ ते इ.स. १६२७)

### निसर्गाचे चित्रीकरण

अकबरापेक्षा जहांगीराच्या काळात मोगली शैली अधिक बहरास आली. जहांगीरइतका पैसा चित्रकलेवर कोणी खर्च केला नसेल. अकबर बादशहा अध्यात्मप्रेमी होता, जहांगीर बादशहा सौंदर्यप्रेमी. अकबराच्या काळात ग्रंथसजावटीकरता चित्रण अधिक झाले तर जहांगीरच्या काळात चित्रविषयासाठी स्वतंत्रपणे चित्रे निर्माण होऊ लागली.



जहांगीरकालीन चित्रकला



जहांगीरकालीन चित्रकला

पशुपक्षी आणि फुलांची स्वतंत्र चित्रे जहांगीराने काढून घेतली. केवळ गुलाबपुष्पाच्या दीडशेहून अधिक जाती जहांगीरच्या चित्रसंग्रहात चित्रित झालेल्या आढळतात. जहांगीरने तयार करून घेतलेला फुलांचा संग्रह वनस्पतीशास्त्राचा एक अमूल्य ठेवा मानला जातो. जहांगीर शिकारीस निघाला अगर युद्धासाठी निघाला तरी चित्रकारांचा एक ताफा तो बरोबर घेऊन जाई आणि निसर्गात आढळणारा कोणताही वैशिष्ट्यपूर्ण प्राणी अगर फूल तो आपल्या चित्रकारांकडून चित्रित करून घेई. नाना तऱ्हेच्या पशुपक्ष्यांची आणि फुलांची चित्रे रंगवून घेऊन निसर्ग सौंदर्याचा जणू खजिनाच जहांगीरने चित्रात जतन करून ठेवला. केवळ निसर्ग सौंदर्य हाच या चित्रांचा विषय असल्याने भारतीय चित्रकलेत निसर्गाने सूक्ष्मदर्शन घडू लागले व त्यानंतरच्या कांग्रा शैलीवर त्याचा परिणाम झाला.

परदेशातील अनेक चित्रकारांची चित्रे जहांगीर विकत घेत असे. त्यांच्या अभ्यासानेही मोगल चित्रकलेत सफाईदारपणा व वास्तवता यांचा विकास घडला. अबुलहसन, लाल, सावळा, मुहंमद नादिर, फरुखबेग, महंमद मुरार वगैरे निपुण चित्रकार जहांगीरच्या दरबारात होते. अबुल हसन हा त्यांचा सर्वात आवडता चित्रकार होता व 'नादिरउलजमा' म्हणजे या युगाचे आश्चर्य अशी जहांगीरने त्यास पदवी दिली होती.

जहांगीरनंतर गादीवर आलेल्या शहाजहान याने चित्रकलेपेक्षा वास्तुकलेला अधिक आश्रय दिला व त्यानंतर गादीवर बसलेला औरंगजेब हा कलेचा द्‌वेष्टा होता. त्यामुळे जहांगीरच्या कारकीर्दीनंतर मोगल चित्रकलेचा ऱ्हास झाला.

### मोगल व राजपूत चित्रकलेची तुलना

मोगल शैलीचा मूळ आधार इराणी शैलीत होता व इराणी शैलीचा भारतीय शैलीशी संयोग होऊन मोगल शैली जन्माला आली. राजपूत शैली मात्र शुद्‌ध भारतीय स्वरूपाची होती. या दोन्ही शैलींचा विकास एकाच काळात झाला. मात्र राजपूत शैलीतील विषय आणि प्रतीके खास भारतीय आहेत. मोगल शैलीतील चित्रे राजविलास व राजदरबार दाखवणारी आहेत. उलट राजपूत शैलीतील चित्रे कल्पनाप्रधान आणि तत्कालीन लोककल्पना दाखवणारी आहेत. मोगल कलावंतांनी राजविलास चित्रित केले तर राजपूत कलावंतांनी लोकजीवन रंगवले. मोगलशैलीत राजउद्‌यान, राजपरिवार, राजदरबार, युद्‌ध यांची दृश्ये दिसतात. राजपूत शैलीत लोककथा, धार्मिक रितीरिवाज, वस्त्र बनवणारा विणकर, वस्त्र रंगवणारा रंगारी, रात्री



चित्र : मोगलशैली



चित्र : मोगलशैली



चित्र : राजपूत शैली

शेकोट्यांजवळ बसलेले शेतकरी असेच विषय चितारले गेले. राजविलासापेक्षा कृष्णलीलातच ते रंगले. मोगल चित्रकलेतील आकार एकमेकांपासून अलग वाटतात. पण राजपूत कलेत एक प्रकारची गती आणि ओघ यामध्ये हे आकार गुंतल्यासारखे भासतात. मोगल चित्रशैलीचा आरंभ छोट्या चित्रांनी झाला तर राजपूत



चित्र : राजपूत शैली

चित्रशैलीचा आरंभ भित्तीचित्रांनी झाला. मुघल शैलीत कलमाचा बारकावा आणि रंगछटांची नाजूकता अधिक होती. उलट राजपूत शैलीत रंगरेषांचा जोमदारपणा अधिक भासतो. राजपूत चित्रशैलीवर तुळशीदास, सुरदास आणि मीरा या संतकवींच्या काव्यांचा मोठा परिणाम दिसून येतो. राजपूत चित्रकारांची नावे चित्रावर आहेत. राजपूत चित्रे उत्तर भारत, राजस्थान, पंजाब, हिमाचल प्रदेश इत्यादी शहरांपुरतीच मर्यादित राहिलेली दिसतात. राजपूत चित्रे अनेकदा भिंतीवर काढलेली दिसतात. तशी मोगलचित्रे दिसत नाही.

### पहाडी लघुचित्र शैली (कांग्रा चित्रशैली)

#### हिमालयाच्या कुशीत फुललेली कलापुष्पे :

औरंगजेब बादशाह धर्माचा कडवा अनुयायी होता. त्याला कलेची रुची नव्हती. त्याने चित्रालये बंद केली आणि चित्रकारांना घालवून दिले. बिहार, बंगाल, राजपुताना, हिमालयाच्या पहाडातील राज्ये अशा विविध राजांच्या आश्रयाला हे चित्रकार निघून गेले. त्यातील काही चित्रकार हिमालयाच्या पहाडातील राजपूत राजांच्या आश्रयाला गेले. त्या चित्रकारांनी निर्माण केलेली कला, पहाडी कला या नावाने ओळखली जाते. मोगल दरबारातील कुंद वातावरणातून हिमालयातील स्वच्छ आणि निरोगी हवेत कला येऊन पोहोचली. मोगल दरबारातील कलावंतांना राजाच्या खुशामतीसाठी चित्रे काढावी लागत. पण हे बंधन पहाडी कलेत सुटले.

अकराव्या शतकात वैष्णव धर्माचा मोठा प्रसार झाला. कवी जयदेव चैतन्य, सूरदास, केशवदास, मीराबाई या सर्व प्रतिभासंपन्न कवींनी विष्णूभक्तीचे गुणगान केले. पहाडी कलेवर या काव्याचा मोठा परिणम दिसून येतो. पहाडी चित्रकलेत कृष्णलीलेवर आधारित अनेक चित्रे काढलेली दिसतात. जयदेवाचे गीतगोविंद, बिहारीचे बिहारी सतसई, भागवत पुराण, रामायण, महाभारत इत्यादी विषयावर चित्रे आढळतात. या

व्यतिरिक्त संगीतातील रागरागिण्या व ऋतू या विषयांवर काढलेली चित्रे आढळतात.

सर्व चित्रे लघु आकाराची आहेत. केवळ राजदराबारातच ही चित्रे राहिली नाहीत तर सामान्य माणसाच्या घरातून ही चित्रे गेली. आज अस्तित्वात असलेल्या पहाडी चित्रांची संख्या पन्नास हजारांच्या घरात आहे. पहाडी चित्रकारांच्या चित्रशाळा होत्या व गुरुकुलांच्या व्यवस्थेप्रमाणे तेथे शिकवण्याचे वर्ग चालत. एका रेखाटनावरून अनेक चित्रे तयार केली जात. मूळ रेखाटन हरणाच्या चामड्यांवर काढलेले असे व त्यावर रंगांची नावे लिहिलेली असत. फुले, फळे यांपासून चित्रकार स्वतः रंग तयार करत. हातकागद तयार केला जाई व तो 'सियालकोटी' या नावाने प्रसिद्ध असे. हा कागद शुभ्र पांढरा नसे; तो फिकट बदामी रंगाचा असे. प्रथमतः तांबड्या रंगाने रेखाकृती काढली जाई; नंतर संपूर्ण कागदावर पांढरा रंग देऊन किंवा कागद घोटून कागदाची चकाकी वाढवली जाई. नंतर काळसर भुरकट रंगाने रेखाकृती काढण्यात येई. पहाडी चित्रकला ही काश्मीरच्या खोऱ्यात वेगवेगळ्या राजघराण्यांकडे आश्रयार्थ राहिलेल्या वेगवेगळ्या कलावंतामुळे निर्माण झाली. बसौली, गुलेर, कांग्रा, चंम्बा, मंडी, जम्मू, विलासपूर, कुलू आणि गढवाल अशा विविध कलमांचा पहाडीकलेत समावेश होतो. त्यात बसौली, कांग्रा व गढवाल या प्रमुख शैली मानल्या



कांग्रा चित्रशैली



कांग्रा चित्रशैली

जातात. यानंतरच्या काळात पहाडी प्रदेशावर शीखांचे राजकीय वर्चस्व होते. शिकारचित्रे, दरबारचित्रे, व्यक्तीचित्रे अशा विषयांना जास्त प्राधान्य देऊन निर्मितीचा दर्जा घसरत गेला. पुढे इंग्रज अधिकाऱ्यांची व्यक्तिचित्रणे दिसू लागली व अखेरीस पहाडी चित्रकलेचे सुंदर रूप संपुष्टात आले. लाहोरच्या किल्ल्यातील भित्तीचित्रे व शाही बुरुजाचे नक्षीकाम शीखांच्या काळात झाले होते. राजा रणजीतसिंगाचा मुलगा दिलीपसिंग चित्रकलेचा भोक्ता होता.

सकृतदर्शनी विविध शैली आणि त्यांची कलमे विविध राजघराणी आणि विविध काळ यांत पहाडी शैलीतील कला प्रवाह बहरत गेला. विविध कला प्रवाहातून पहाडी शैलीची फुललेली कलापुष्पे याच्या मूळाशी समधर्मपणा होता, हे या सर्व कलमांच्या इतिहासातून दिसून येईल.

### कांग्रा चित्रशैली

कांग्रा चित्रशैली पहाडी शैली या नावानेच ओळखली जाते. कांग्राचा पराक्रमी राजा संसारचंद्र (इ.स १७७५ ते १८२३) याने चित्रकलेला फार मोठा आश्रय दिला व त्यामुळे कांग्रा चित्रशैलीची भरभराट झाली. मांडकु आणि नैनसुख या चित्रकारांची बरीच कामे कांग्रा चित्रशैलीत आढळतात. त्यात मांडकुचे नाव

विशेष मोठे आहे. राजा संसारचंद्रामुळे केवळ भारतातच नव्हे तर भारताबाहेरही ही चित्रे गेली. सदर चित्रशैलीतील निसर्गचित्रण मनोहर आहे. हिमालयातील शिखरे, पशुपक्षी, ऋतु आणि मोसम, मेघ आणि बिजली, सूर्योदय आणि सूर्यास्त, पाऊस आणि थंडी या साऱ्यांचे उत्कृष्ट चित्रण या चित्रांत आढळते. ४ एप्रिल १९०५ रोजी या पहाडात मोठा भूकंप झाला आणि या भूकंपात येथील चित्रकार आणि त्यांची चित्रे भूमीत गडप झाली. अन्य प्रांतात केलेल्या चित्रांवरून कांग्रा चित्रशैलीची कल्पना येते.

## २. चित्रकार

### राजा रविवर्मा :

(जन्म : २९ एप्रिल १८४८ मृत्यु : २ ऑक्टोबर १९०६)



राजा रविवर्मा


यांचा जन्म केरळ राज्यातील त्रावणकोर संस्थानामध्ये किलमन्नूर या गावी झाला. त्यांच्या घरात विद्येला मान होता. आई उमांबा नृत्यनिपुण होती. वडील श्रीकान्तन भट्टभिरीपाद संस्कृत पंडित होते. त्रावणकोर संस्थानातील महाराजांच्या बहिणीशी त्यांचा विवाह झाला. सुरुवातीला खडू व कोळसा वापरून ते चित्रे काढत. त्यांनी जलरंगात चित्रे काढण्याचा अभ्यास



चित्र : सरस्वती

केला. पाश्चात्य पद्धतीने तैलरंगाचा वापर करून चित्रे निर्माण करून, त्यांनी स्वतःची शैली निर्माण केली. इ.स. १८६८ मध्ये थिओडोर जेन्सन या इंग्लिश चित्रकाराने त्रावणकोरच्या राजघराण्यातील व्यक्तींची तैलरंगात चित्रे काढली. ते काम पाहण्याची त्यांना संधी मिळाली. त्यांनी नंतरच्या काळात अनेक व्यक्तिचित्रे व इतर प्रकारची चित्रे तैलरंगात रंगवली.

इ.स. १८७३ च्या मद्रास येथील प्रदर्शनात 'एक नायर स्त्री' या चित्राला सुवर्णपदक मिळाले. व्हिएन्ना येथील प्रदर्शनातही याच चित्राला सुवर्णपदक मिळाले. शकुंतला पत्रलेखन या चित्रालाही १८७४ मध्ये सुवर्णपदक मिळाले. इ.स. १८८१ मध्ये बडोद्याचे



चित्र : क्लासिकल इंडियन पेंटिंग

महाराज सयाजीराव गायकवाड यांनी त्यांच्याकडून अनेक चित्रे काढून घेतली.

भारतीय विषयावरील चित्रण, उत्कृष्ट, संयोजन, वातावरणातील त्रिमितीय आभास, प्रमुख विषयास महत्व, छाया प्रकाशाचा परिणामकारक वापर, तैलरंगाचा प्रभावी वापर, यथादर्शन तंत्राचा वापर, मुख्य विषयाच्या मांडणीतील बारकावे, पोशाख-अलंकार यातील तपशील, चेहऱ्यावरील भावदर्शन, प्रमाणबद्धता, स्त्री-पुरुषांचे सुडौल रेखांकन या दृष्टीने राजा रविवर्मा यांची चित्रे उल्लेखनीय आहेत. देवतांची, स्त्रियांची वस्त्रे, महाराणीची नऊवारी वस्त्रे महाराष्ट्रीयन पद्धतीने दाखवली आहेत. त्यांच्या चित्रांचे विषय



चित्र : शकुंतला पत्र-लेखन

प्रामुख्याने व्यक्तिचित्र, रामायण, महाभारत यातील प्रसंग, पौराणिक कथांचे प्रसंग असे आहेत.

राजा रविवर्मा यांनी रंगीत चित्रे छापण्याचा भारतातील पहिला छापखाना लोणावळ्याजवळ मळवली येथे सुरू केला. त्यासाठी त्यांनी जर्मनीमधून लिथो प्रेस आणला. त्यांनी तयार केलेली देवादिकांची, पौराणिक प्रसंगावरील चित्रांच्या छापील प्रती भारतात घरोघरी दिसू लागल्या. अत्यंत कमी किंमतीतल्या या चित्रांमुळे राजा रविवर्मा यांचे नाव सामान्यांना माहीत झाले. नल-दमयंती, राधा-माधव, विश्वामित्र-मेनका, सीता स्वयंवर, सैरंध्री, शंतनु-मत्स्यगंधा, कृष्णजन्म, द्रौपदी वस्त्रहरण, लक्ष्मी, सरस्वती, कृष्णशिष्टाई, शकुंतला पत्रलेखन इत्यादी विषयावरील त्यांची चित्रे प्रसिद्ध आहेत. त्यांची मूळ चित्रे त्रिवेंद्रम, म्हैसूर, बडोदा, उदयपूर, हैद्राबाद, औंध, नवी दिल्ली येथील प्रासादांत व चित्रसंग्रहालयांत पाहावयास मिळतात.

**सैरंध्री**

**प्रकार – चित्राकृती**

**माध्यम – तैलरंग**

**कालखंड – इ.स. १८८५**

**कलावंत – राजा रविवर्मा**



चित्र : सैरंध्री

भारतातील प्रसिद्ध चित्रकार रविवर्मा यांनी हे चित्र रंगवलेले आहे. भारतीय पुराणातील अनेक कथा प्रसंगांवर राजा रविवर्मा यांनी चित्रे रंगवलेली आहेत. या चित्रात पांडवांच्या अज्ञातवासातील एक प्रसंग कोरलेला आहे. या काळात पांडव विराट राजाच्या राज्यात राहात होते. द्रौपदी ही 'सैरंध्री' या नावाने राणीच्या महाली दासी म्हणून काम करीत होती. राणीचा भाऊ किचक याने द्रौपदीचा अपमान केला. त्यामुळे द्रौपदी म्हणजेच 'सैरंध्री' रागाने, अपमानाने महालाबाहेर पायऱ्या उतरून जात आहे व द्वारपाल तिच्याकडे रोखून पाहात आहे. असा प्रसंग चित्रात दाखवला आहे.

**वैशिष्ट्ये** – सैरंध्रीने चेहरा झाकून घेतलेला असला तरी त्यातूनही तिचा अपमानित, रागाने लाल झालेला चेहरा जाणवतो. सैरंध्री व पहारेऱ्यांच्या चेहऱ्यावरील भावदर्शन उत्कृष्ट आहे. महालाच्या बाहेरील पायऱ्यांचे

यथार्थदर्शन, सैरंध्री व पहारेकऱ्यांच्या अंगावरील वस्त्रे, छायाप्रकाश यांचे रंगलेपन उत्कृष्ट आहे. चित्राची मांडणी, रचना या दृष्टीने हे चित्र अप्रतिम आहे.

**नंदलाल बोस:**

(जन्म : ३ डिसेंबर १८८३ मृत्यु : १६ एप्रिल १९६६)



नंदलाल बोस

यांचा जन्म बिहार राज्यातील खरगपूर, पश्चिम बंगाल या ठिकाणी झाला. अवनिंद्रनाथ टागोर यांच्या शिष्यांमधील ते होतकरू व हुशार शिष्य होते. १९११ मध्ये त्यांनी अजंठा येथे राहून या लेण्यांमधील चित्रांचा बारकाईने अभ्यास केला व काही चित्रांच्या प्रतिकृती तयार केल्या. सुरुवातीच्या काळात राफाएल, रविवर्मा यांच्या चित्रांच्या प्रतिकृती तयार केल्या. नंदलाल बोस यांना भारतीय पारंपरिक चित्रशैली व जीवन यांविषयी आदर होता. बाघ लेण्यामधील चित्रांचाही त्यांनी अभ्यास केला व येथील चित्रांच्या प्रतिकृती ग्वाल्हेर संस्थानासाठी तयार केल्या. त्यांच्या चित्रावर अजंठा व बाघ शैलीचा प्रभाव अधिक दिसून येतो. १९०७ मध्ये त्यांनी काढलेल्या 'सती' या चित्राने त्यांना लौकीक मिळवून दिला. रविंद्रनाथ टागोर यांनी स्थापन केलेल्या 'विश्वभारती' या संस्थेच्या कला भवन या शाखेचे ते प्रमुख होते. १९२४ मध्ये त्यांनी रविंद्रनाथ टागोर यांच्याबरोबर चीन व जपान या देशांना भेट दिली.



चित्र : अ लेडी आर्टिस्ट

नंदलाल बोस यांनी ३० वर्षांहून अधिक काळ कलेचे अध्यापन कार्य केले. त्यांच्या कलानिर्मितीत प्राचीन भारतीय परंपरा, राष्ट्रीय विचारसरणी व आधुनिक तंत्र हे तीन प्रवाह दिसतात. १९३० मध्ये त्यांची महात्मा गांधीशी भेट झाली. हरिपूरच्या काँग्रेस अधिवेशनाची सजावट त्यांच्याकडे सोपवण्यात आली होती. त्यामुळे त्यांची राष्ट्रीयत्वाची भावना प्रबळ झाली. या अधिवेशनात बहुजन समाजातील लोकांना आकर्षक वाटतील अशी हरिपूर पोस्टर्स नावाची ६० पोस्टर्स त्यांनी तयार केली. त्यामध्ये भारतीय लोकजीवनातील शेतकरी, कारागीर, लोकसंगीतकार असे चित्रण आढळते. शांतीनिकेतनमधील चित्रभवनाच्या भिंतीवर त्यांनी भित्तीलेप चित्रे (म्यूरल्स) रंगवली. शिवाचे विषप्राशन, शिवविलाप, शिवतांडव, उमेची तपश्चर्या, युधिष्ठिराची स्वर्गयात्रा, दुर्गा, यम आणि सावित्री,



चित्र : सती

कैकयी, अहिल्या, कर्ण, कृष्ण आणि अर्जुन, गांधारी, गुरुवर्य अवनिंद्रनाथ टागोर यांचे व्यक्तिचित्र, दांडीमार्च इत्यादी चित्रे प्रसिद्ध आहेत. बुद्धाचे पुनरागमन हे त्यांचे चित्र विशेष प्रसिद्ध आहे.

त्यांच्या चित्रांत जलरंगातील वॉश पद्धत वापरलेली दिसते. अजंठा, बाघ शैलीत रेखाटन, नाजूक रेषा, सपाट पारदर्शक परंतु आल्हाददायक रंग, ओघवत्या लयदार नाजूक अलंकारिक रेषा, अलंकारिकपणा, विविध पद्धतीच्या निसर्गचित्रात वापरलेली रंगीत शाई/काही चित्रात पाश्चात्य कलेचा प्रभाव, पेन्सिल, पेन अँड ईंक, ब्रश, क्रेयॉन, टेंपरा अशा विविध माध्यमांचा वापर ही त्यांच्या चित्रांची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या चित्रप्रणालीत देशी रंग, देशी कागद आणि देशी तंत्र यांचाच वापर असे. त्यांना बनारस, कलकत्ता, रविंद्रभारती या विद्यापीठांनी डी.लिट, भारत सरकारने १९५४ मध्ये पद्मविभूषण पदवी देऊन सन्मानित केले आहे.

**अमृता शेरगिल:**

(जन्म : ३० जानेवारी १९१३ मृत्यु : ५ डिसेंबर १९४१)



अमृता शेरगिल

भारतीय चित्रकलेला आधुनिकतेचे वळण व दिशा देणाऱ्या अमृता शेरगिल या पंजाबी चित्रकर्तीचा जन्म हंगेरी येथील बुडापेस्ट या शहरी झाला. तिने पॅरीस येथे ३ वर्षे पाश्चात्य चित्रशैलीचा अभ्यास केला. या



चित्र : ब्रम्हचारी

काळात तिने ६० हून अधिक चित्रे रंगवली. अनेक चित्रांना पारितोषिके मिळाली. इ.स. १९३४ मध्ये ती भारतात आली. भारतभर फिरून तिने भारतीय कलेचा अभ्यास केला. भारतीय शिल्पकला, अजंठा येथील चित्रकला, राजस्थानी, बसौली या लघुचित्र शैलीचा तिच्या चित्रात प्रभाव दिसून येतो. तिच्या शैलीवर व्हॅन गॉख व पॉल गोगॅ या दृकप्रत्ययवादी कलावंतांचा प्रभाव होता. पाश्चात्य कला व पारंपरिक शैली यांचा उत्कृष्ट समन्वय तिच्या चित्रातून दिसतो. तैलरंगाचा प्रभावी वापर, मानवी आकारांची साधी मांडणी, ठसठशीत व जोरदार आरेखन, शुद्ध व वेधक रंगयोजना, चित्रातील आकारांची मांडणी, अवकाश विभाजन, समतोल आकृतिबंध गडद व उजळ रंगछटाबरोबर करड्या रंगांचा वापर ही त्यांच्या चित्रांची वैशिष्ट्ये आहेत. विविध व्यक्तिचित्रे, स्वत:ची व्यक्तिचित्रे, तीन युवती, मदर इंडिया, द बेगर्स, नवरी अशा विविध विषयांची त्यांची चित्रे प्रसिद्ध आहेत. अनेक ठिकाणी त्यांच्या चित्रांची प्रदर्शने झाली. भारतीय चित्रकलेला नव्या परिवर्तनाची दिशा देणारी ही प्रतिभावान चित्रकर्ती वयाच्या २९व्या वर्षी दि. ५ डिसेंबर १९४१ रोजी एका छोट्याशा आजाराने कलाविश्व सोडून गेली. त्यांची बहुतेक चित्रे नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट दिल्ली व काही खासगी संग्रहालयांत आहेत.

**तीन तरुण मुली**

**माध्यम : तैलरंग, कॅनव्हॉस**

**कलाकार : अमृता शेरगिल**

**कालखंड : १९३४ – १९४१**

**वैशिष्ट्ये :** भारतीय चित्रकलेला आधुनिकतेचे वळण देणाऱ्या स्त्री चित्रकर्ती अमृता शेरगिल यांचे हे प्रसिद्ध चित्र आहे. पाश्चात्य चित्रशैली व भारतीय पारंपरिक चित्रशैली यांच्या अभ्यासातून ग्रामीण जीवनाचा परिणाम त्यांच्या चित्रातून व्यक्त होत होता.



चित्र : तीन तरुण मुली

अशाच शैलीतून 'तीन तरुण मुली' हे चित्र साकारले आहे. मुलींच्या शरीराचे आरेखन, एका बाजूने व तीन चतुर्थांश चेहरे रंगवण्याची पद्धत, चेहऱ्यावरील हताश व निराश भावदर्शन, डोळ्यांच्या विशिष्ट रचना, तांबड्या रंगांची वस्त्रे परिधान केलेल्या ग्रामीण मुली, उत्कृष्ठ रचना व रंगयोजना या सर्व वैशिष्ट्यांमुळे हे चित्र विशेष प्रसिद्ध झाले आहे.

**एन. एस. बेंद्रे (नारायण श्रीधर बेंद्रे)**

(जन्म : २१ ऑगस्ट १९१० मृत्यु :१९ फेब्रुवारी १९९२)



एन. एस. बेंद्रे

**कलाजीवन –**

यांचा जन्म इंदूर, मध्यप्रदेश येथे झाला. आग्रा विद्यापीठ पदवी (१९३३) त्यांचे सुरुवातीचे कलाशिक्षण स्टेट स्कूल ऑफ आर्ट, इंदोर येथे श्री. डी. डी. देवळालीकर यांच्या हाताखाली झाले. इ.स. १९३४ मध्ये गव्हर्नमेंट ऑफ बॉम्बे कॉलेजमधून त्यांनी पेंटिंग डिप्लोमा घेतला.

इ.स. १९३६ ते १९३९ या काळात गव्हर्नमेंट ऑफ काश्मीरमध्ये चित्रकार व पत्रकार म्हणून काम केले. त्या काळात काश्मीर खोऱ्यातील निसर्गाची रेखाटने केली. त्यामुळे त्यांच्या चित्रात आल्हाददायक रंग व रम्य निसर्गाचा प्रत्यय येतो. नंतर त्यांनी मुंबई येथे स्वतंत्र चित्रकार म्हणून काम सुरू केले. व्यक्तिचित्रे, म्युरल भित्तिचित्रे, कथाचित्रे केली. कला दिग्दर्शक म्हणून मद्रासमध्ये काम केले.



चित्र : पाऊंडिंग व्हीट

इ.स. १९५२ मध्ये भारत सरकारतर्फे चीनमध्ये गेलेल्या सांस्कृतिक मंडळात प्रतिनिधी म्हणून सहभाग होता. बडोदा स्कूल ऑफ आर्ट, बडोदा येथे पेंटिंग विभागाचे ते विभागप्रमुख होते. त्यांच्या हाताखाली अनेक मान्यवर चित्रकार निर्माण झाले.

**चित्रशैली व वैशिष्ट्ये –** उत्कृष्ट निसर्गचित्रकार व रचनाकार आणि प्रामुख्याने रंगसम्राट म्हणून प्रसिद्ध आहेत. भारतीय लघुचित्रशैलीचा प्रभाव दिसतो. इ.स. १९४७–४८ मध्ये अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड, बेल्जियम या देशांना भेटी दिल्या. त्या वेळी आधुनिक कलेचा त्यांच्यावर प्रभाव पडला, पण हा पाश्चात्य



चित्रकार : एन. एस. बेंद्रे

संस्कार पचवून त्यांनी आपली स्वतःची नावीन्यपूर्ण शैली निर्माण करून कलाक्षेत्रात वेगळे स्थान निर्माण केले. दैनंदिन जीवनातील मार्मिक विषयांपासून ते अप्रतिरूप चित्रणापर्यंत त्यांनी नवेनवे प्रयोग यशस्वीपणे केले. त्यांनी आपल्या कल्पनेला रंग, रेषा, आकार यांच्या एकाच चाकोरीत कधीच बंदिस्त केले नाही. प्रयोगशीलता, रम्य कल्पनाविलास, मोजक्या भावपूर्ण रंगाची मोहक रचना, आकारांची तालबद्‌ध आकर्षक मांडणी केली. संवेदनाशील मनाच्या ह्या चित्रकाराने आपल्या चित्रांतून भावनांचा मुक्त आविष्कार घडवला. मोहक आकार, आनंददायी रंगयोजना, प्रतीकात्मक आकार, रंग आणि रंगलेपनाची नवी किमया ही यांच्या चित्रांची खास वैशिष्ट्य होत. चित्रांतील आकार, त्यांचे एकमेकांशी प्रमाण, आकारातील साधेपणा, आकर्षक पार्श्वभूमी, कधीकधी आकृती लहान काढून छोट्या चित्रात भव्यता निर्माण करण्याची किमया त्यांच्यात होती.

'मी या मातीशी निगडीत आहे. मी चालतो, खातो या मातीवर. मी या मातीशिवाय दुसरा कुठलाही विचार करीत नाही, मी स्वप्न चित्रे रंगवत नाही. जे काही या जगात मी अनुभवतो, ते मी रंगवतो. इतर गोष्टी माझ्याकरता महत्वाच्या नाहीत'. १९९० ते १९९२ मध्ये रंगवलेल्या चित्रविषयक भूमिकेबद्‌दल त्यांनी काढलेले हे उद्‌गार त्यांच्या चित्र शैलीविषयी पुरेसे बोलके आहेत.

बेंद्रे यांनी वास्तवतेचे भान कधीही सोडले नाही. पण वास्तवातील कुरूपता, दुःख, दारिद्र्य, शोक, अतिभावनिक उद्रेक इत्यादी घटकांपेक्षा वास्तवातील सुंदर आनंददायी, आल्हाददायक, प्रसन्न असे रूपच आपल्या कुंचल्यातून साकार केले. ' मी चित्र रंगवतो कारण मला त्यातून आनंद मिळतो. सुख मिळते. त्याचप्रमाणे ते इतरांनाही देण्याचा मी प्रयत्न करतो.' असे ते म्हणतात.

इंदूर ही जन्मभूमी असलेल्या बेंद्रे यांच्यावर जवळच असलेल्या माळवा या निसर्गरम्य परिसराचाही परिणाम होणे साहजिकच होते. बेंद्रे यांनी देशात व परदेशात आयुष्यभर खूप भटकंती केली. त्यातूनच त्यांना चित्रासाठी नित्य जीवनातील विषय मिळत. शांतीनिकेतनमध्येही ते काही काळ होते. नंदलाल बोस यांचा सहवास त्यांना लाभला.

भारतीय लघुचित्रातील अतिशय मोहक व हळुवार रंगसंगती, पाश्चात्य उत्तर दृकप्रत्ययवादी रंगलेपन तंत्र, त्याचबरोबर क्युबिझम, फॉव्हिझम या पाश्चात्य चित्रशैलीतील रंगलेपन तंत्र, रंगसंगती यांचा प्रभाव त्यांच्या एकूण चित्रनिर्मितीच्या कारकिर्दीत टप्प्याटप्प्यांवर दिसून येतो. अशा प्रयोगशीलतेतून त्यांची स्वतःची शैली घडवली.

### प्रसिद्ध कलाकृती

**थॉर्न :** हे १९५५ मध्ये बडोदा विद्यापीठात पेंटिंग विभागाचे प्रमुख झाल्यानंतर नॅशलन अॅवॉर्ड लाभलेले चित्र. भारतीय व पाश्चात्य शैलीचा मिलाफ यात दिसतो. पायातील काटा काढणारी युवती. फांदीचा आधार घेऊन उभी असलेली त्रिभंग अवस्थेतील ही पोज; भारतीय खजुराहो शिल्पशैलीची आठवण करून देते. स्त्रीच्या शरीराचा कमरेपर्यंतचा भाग समोरून दिसतो तसा व कमरेखालचा मागील पार्श्वभाग हा पुढे दाखवून खजुराहोच्या 'सुरसुंदरी' शिल्पाशी साधर्म्य साधले आहे. स्त्री, आकृती, झाड व मागील डोंगर या सर्व घटकांचे घनवादी शैलीत विभाजन करून द्विमिती व त्रिमितीचा भाग साधला आहे. लाल, पिवळा व निळा या प्राथमिक तेजस्वी रंगाचा वापर यात केला आहे.

या घनवादी शैलीतील दुसरे चित्र 'सूर्यफूल'. मात्र या घनवादी शैलीत बेंद्रे यांचे मन रमले नसावे. पाश्चात्य प्रभावातून अनेक कलाकार बाहेर पडले व स्वतःचीच शैली ज्यांनी निर्माण केली त्यात बेंद्रे हे अग्रगण्य होते. त्याचे समकालीन चित्रकार हुसेन, हेब्बर यांनीही आपापल्या वाटा शोधल्या.

या चित्रात तीन सूर्यफूले एका फुलदाणीमध्ये ठेवलेली दाखवलेली आहेत. हे चित्र पूर्ण वास्तववादी नाही. घनवाद व भावाविष्कारवाद्यांचा एकत्रित प्रयोग आहे. बेंद्रे यांनी जे काही विविध वादांचे प्रयोग केले, त्या प्रयोगमालिकेतील एक चित्र. सूर्यफुलाच्या पिवळ्या पाकळ्यामधल्या परागकणांचा गोलाकार मोठा गडद तांबूस रंगाचा. फुलांच्या मागे निळ्या – करड्या रंगाचे पतंगाकृती आकार. खाली फुलदाणी, फुलांचे व फुलदाणीचे विषमतोलामध्ये रेषांनी केलेले विभाजन. या सर्व गोष्टी मिश्रशैलीतून निर्माण झालेल्या आहेत. फुलांच्या पार्श्वभूमीवर निळ्या रंगाचा वापर केल्यामुळे फुलांना उठाव मिळाला आहे. उत्कृष्ट संयोजन, रंगयोजना हे या चित्राचे विशेष. पाश्चात्य कलेच्या प्रभावाखाली निर्माण झालेली बेंद्रे यांची ही कलाकृती होय.

### रंग

'रंगसम्राट' म्हणून ओळखले जाणारे बेंद्रे. यांच्या चित्रातील रंग मनाला भुरळ पाडतात. रंगलेपनातील हळुवारपणा, सहजता, नवनवीन पद्धती, तंत्र हा महत्त्वाचा गुण त्यांच्याकडे होता. त्यांच्या चित्रातील मूळ रंग कधीच भडक वाटत नाहीत, भासत नाहीत. मूळ रंगाचा वापर करताना त्याची तेजस्विता दुसरा रंग अल्पप्रमाणात मिसळून त्याचा तेजस्वीपणा, भडकपणा कमी करत. त्यामुळे रंगाला एक प्रकारचे गहिरेपण निर्माण होत असे. मंद – मधुर रंग चित्रातील वातावरण आल्हाददायक करतात. रंगलेपनातील 'कंपन' हा आणखी एक खास भाग. हे रंगातील 'कंपन' (व्हायब्रेशन) रंगलेपनातील विविध पद्धती तंत्राने मिळवत. त्यामुळे चित्र एक चैतन्यमय, संवेदनशील आकृती बने. रंग एकमेकांवर देऊन तर एकावर दुसरा रंग लावून, ब्रशच्या फटकाऱ्याद्वारा पण फटकारेही हळुवार, तर कधीकधी ठिपक्यांनी, तर कधी रेषेने रंगलेपन करून हे कंपन साधत. चित्रात एकसंधपणा प्राप्त करत. चित्रातील गडद आणि उजळ रंगांची तोलयुक्त मांडणी वैशिष्ट्यपूर्ण असते.

### पारितोषिके

इ.स. १९४१ सुवर्णपदक – बॉम्बे आर्ट सोसायटी (मुंबई). इ.स. १९४६ पटेल ट्रॉफी – आर्ट सोसायटी ऑफ इंडिया, मुंबई आणि त्याच वर्षी संस्थेचे अध्यक्षपद भूषवले, इ.स. १९४६ शांतिनिकेतनला सन्मानित चित्रकार म्हणून भेट दिली. इ.स. १९४३ मध्ये मुंबई येथे पहिले व्यक्तिगत प्रदर्शन भरवले. पुढे मुंबईत अनेक व्यक्तिगत प्रदर्शने भरवून नवनवीन चित्रांची मेजवानी रसिकांना दिली. अमेरिकेत पाच चित्र प्रदर्शने भरवली. १९६९ साली 'पद्मश्री' पुरस्काराने यांना सन्मानित करण्यात आले.

### प्रसिद्ध कलाकृती

वेणीफणी (१९४९), सूर्यफुले (१९५५), मंकी (१९५७), गाय – वासरू (१९४८), घराकडे, छकडा.

## श्री. वासुदेव गायतोंडे

(जन्म : इ.स. १९२४ मृत्यु :१० ऑगस्ट २००१)



वासुदेव गायतोंडे

अप्रतिरूप (केवलवादी) कलाशैलीत काम करणारे एक प्रतिथयश कलावंत म्हणून श्री. गायतोंडे ओळखले जातात. ते मुंबईतील प्रागतिक कलाकारांच्या गटाचे एक सभासद होते. यांचे कलाशिक्षण मुंबईच्या सर जे. जे. कलामहाविद्यालयात झाले. त्यांच्या प्रारंभीच्या चित्रशैलीवर भारतीय पारंपरिक कलेचा प्रभाव होता. परंतु नंतर त्यांनी आधुनिक पाश्चात्य शैलीचा स्वीकार केला. त्यांच्या काही चित्रांवर पॉल क्ले व कॅन्डिन्स्की या पाश्चात्य कलाकारांच्या शैलीचा स्पष्ट प्रभाव दिसून येतो. बौद्धिक विचारमंथनातून निर्माण झालेल्या आशयगर्भ प्रतीकांच्या साहाय्याने साध्या, मोजक्या आकारांची रचना चित्रावकाशात करून ते समतोल रंगयोजनेतून आपल्या भावना अभिव्यक्त करतात. यांनी भारतीय व परदेशी कलाप्रदर्शनात अनेक पारितोषिके मिळवली. मिळालेल्या शिष्यवृत्तीद्‌वारे ते न्यूयॉर्क व जपानलाही अभ्यासासाठी गेले. भारतात परतल्यावर शेवटपर्यंत त्यांनी दिल्लीत वास्तव केले. १९७१ साली त्यांना ‘पद्‌मश्री’ पुरस्कार मिळाला.



चित्रकार – वासुदेव गायतोंडे

## जिव्या सोमा म्हसे


(जन्म :१९ मे १९३४ मृत्यु :१५ मे २०१८)



जिव्या सोमा म्हसे

पालघर या आदिवासी बहुल जिल्ह्यातील डहाणू तालुक्याच्या पूर्वेकडील गंजाड गावातील जिव्या सोमा म्हसे हे प्रसिद्ध वारली चित्रकार. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी बहुल, डहाणू, विक्रमगड, मोखाडा, जव्हार, तलासरी आणि वसई, पालघर या तालुक्यांत तुरळक वस्ती असलेल्या वारली जमातीमध्ये लग्न, बारसे, पूजापाठादी अनेक संस्कार श्रद्धेने पाळले जातात. अनेक विधींमध्ये देवदेवतांची चित्रे काढणे ही परंपरा असते. येथील आदिवासींच्या झोपड्यांमधील कारवींच्या विणलेल्या आणि शेणाने लिंपलेल्या कुडावर, प्राणी, पक्षी, देवदेवता, निसर्ग आदी चित्रे काढलेली दिसून येतात.

वारली चित्रे काढण्याची मक्तेदारी स्त्रियांची असायची. परंतु तेराव्या वर्षी सहजच चित्र रेखाटले. त्यांची या आदिवासी संस्कृतीतील तारपा नृत्य, लग्नाचा मांडव, लग्नाचे विधी, जंगलातील व्यवहार आदींची चित्र उठावदार व वैशिष्ट्यपूर्ण ठरू लागली. शाळेतही त्यांच्या चित्रांची प्रशंसा व्हायची. ही आवड त्यांनी पुढेही चालू ठेवली. वारली पेंटिंगसाठी वापरले जाणारे रंगही नैसर्गिक फुलापानांपासून तयार केलेले असतात. म्हसे हे रंग स्वत: बनवत. तसेच चित्र काढण्यासाठी लागणाऱ्या काड्या ह्यादेखील ते स्वत: वनस्पतीपासूनच बनवत असत.



चित्रकार – जिव्या सोमा म्हसे

जिव्या म्हसे यांच्या पेंटिंग्जची माहिती ऐकून भास्कर कुलकर्णी हे मुंबईतील कलापत्रकार त्यांच्या गंजाड येथील मुक्कामी आले. यांच्या अद्वितीय कलेबद्दल तात्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या सांस्कृतिक सचिव आणि तेव्हाच्या ट्रेड फेअर ऑथॉरिटी ऑफ इंडियाच्या अध्यक्ष पुपुल जयकर यांच्या कानावर घातली. पुपुल जयकर या सांस्कृतिक क्षेत्रातील जाणकार आणि भारतीय संस्कृतीच्या अभ्यासक होत्या. त्यामुळे त्यांच्या चौकस नजरेतून म्हसेंची ही उपेक्षित राहिलेली वारली कला सुटली नाही. त्यांनी यांची कला प्रथम राष्ट्रीय स्तरावर आणि नंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवली. परदेशी रसिकांना भारतीय अभिजात संस्कृती, तसेच कलेचे फार आकर्षण असते. तोच विचार करून जयकर यांनी त्यांच्या चित्रांना प्रसिद्धी दिली. त्यातूनच जर्मनी, इस्त्रायल, अमेरिका, इंग्लंड, रशिया, चीन, आखाती देश अशा जगाच्या कानाकोपऱ्यात यांची चित्रे पोहोचली. जंगलामधल्या कडेकपारीत लपलेली वारली चित्रकला जगाच्या नकाशावर जिवा म्हसे यांनी नेली.

भारत सरकारने १९८२ साली म्हसे यांना पावणेतीन एकर जमीन दिली. तेथे त्यांची कलासाधना सुरू होती. मुंबई, वसई, डोंबिवली, डहाणू तालुक्याबाहेर ठाणे येथील महाविद्यालयात वारली चित्रकलेचे धडे विनामूल्य दिले आहेत. त्यांना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सन्मानांनी गौरवले गेले. १९७६ साली राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले व २०११ साली भारत सरकारने त्यांना 'पद्मश्री' देऊन वारली कलेला राजमान्यता व लोकमान्यता मिळवून दिली. तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला.

**उपक्रम : आपल्या परिसरातील चित्रकाराची माहिती फोटोसह लिहा.**

.........................................................
.........................................................
.........................................................

## माझा अभ्यास

### १. लघुचित्रशैली.

**प्र.१ थोडक्यात माहिती लिहा.**

१) अकबरकालीन चित्रकला.

२) जहांगीरकालीन चित्रकला.

३) पहाडी शैली

**प्र.२. मोगल व रजपूत चित्रकलेची तुलना पुढील मुद्द्यांच्या आधारे करा.**

१) काळ २) खास वैशिष्ट्ये ३) स्वरूप ४) विषय

**प्र.३ एका वाक्यात उत्तरे लिहा?**

१) चित्रकार अबुलहसन यास जहांगीरने कोणती पदवी दिली होती?

२) इराणी शैली व भारतीय शैली यांच्या संयोगातून कोणती शैली निर्माण झाली?

३) अकबराने कोणती चित्रे काढण्यास प्रोत्साहन दिले?

४) जहांगीरकालीन वनस्पतीशास्त्राचा अमूल्य ठेवा कोणता?

५) सचित्र ग्रंथनिर्मितीच्या बाबतीत कोणते चित्रकार अधिक कुशल होते?

६) अकबराच्या काळात किती हस्तलिखित ग्रंथ चित्रबद्ध करण्यात आले?

७) अकबरकालीन चित्रातील 'तर्हा' म्हणजे काय?

८) अकबरकालीन चित्रात रंगकाम करणाऱ्या चित्रकारास काय म्हटले जाते असे?

९) जहांगीरच्या दरबारातील चित्रकारांची नावे कोणती?

१०) अकबराच्या काळात एकाच चित्रावर अनेक चित्रकार काम करत हे कशावरून सिद्ध होते?

११) पहाडी कलेतील प्रमुख शैलींची नावे लिहा.

१२) कांग्रा चित्रशैली अजून कोणत्या नावाने ओळखली जाते?

१३) कांग्रा चित्रशैलीतील दोन प्रमुख चित्रकारांची नावे लिहा.

१४) औरंगजेब बादशाहाच्या काळात चित्रालये बंद का करण्यात आली?

१५) पहाडी कलेत कोणत्या विषयावर चित्रे काढण्यात आली?

१६) उत्तर मध्ययुगात लघुचित्राचा उपयोग कशासाठी केला जाऊ लागला ?

१७) कशावरून 'लघुचित्रे' असे नाव रुढ झाले?

१८) लघुचित्रे कोणत्या रंगात रंगवली गेली?

१९) पश्चिम भारतीय लघुचित्र शैलीचे दुसरे नाव कोणते?

२०) लघुचित्रांना कशाने चकाकी आणली जाई?

२१) राजस्थानी शैलीतील राजदरबारी चित्रे कशामुळे नष्ट झाली?

२२) राजस्थानी शैलीचे वैशिष्ट्य कोणते?

**प्र.४ चूक की बरोबर ते लिहा. वाक्य चुकीचे असल्यास योग्य उत्तर लिहा.**

१) पहाडी चित्रकारांच्या चित्रशाळा होत्या.

२) पहाडी चित्रकार अंतिम रेखाटन हरणाच्या कातड्यावर काढत असत.

३) हस्तव्यवसायाने तयार केलेला कागद 'सियालकोटी' या नावाने प्रसिद्ध असे.

४) 'सियालकोटी' कागदाचा रंग पांढराशुभ्र असे.

५) पहाडी चित्रकार प्रथमतः काळ्या रंगाने रेखाकृती काढत.

## २. चित्रकार

**प्र.१ टीपा लिहा**

१) राजा रविवर्मा

२) अमृता शेरगिल

३) एन.एस. बेंद्रे

**प्र.२ रसग्रहणात्मक सविस्तर टिपा लिहा.**

१) सैरंध्री

२) तीन तरुण मुली

**प्र.३ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) इ.स. १८७३ प्रदर्शनातील राजा रविवर्मा यांच्या कोणत्या चित्राला सुवर्णपदक मिळाले होते ?

२) राजा रविवर्मा यांनी रंगीत चित्रे छापण्याचा कारखाना कोठे सुरू केला होता ?

३) राजा रविवर्मा यांचे पांडवांच्या अज्ञातवासातील प्रसंगावरील काढलेले कोणते चित्र प्रसिद्ध आहे ?

४) नंदलाल बोस यांच्या चित्रांवर कोणत्या शैलींचा प्रभाव अधिक दिसून येतो ?

५) नंदलाल बोस यांना सरकारने कोणती पदवी देऊन सन्मानित केले ?

६) अमृता शेरगिल यांच्या चित्रावर कोणत्या शैलीचा परिणाम दिसून येतो ?

७) 'तीन तरुण मुली' या चित्राच्या चित्रकाराचे नाव लिहा ?

८) एन.एस.बेंद्रे यांना 'रंगसम्राट' का समजले जाते ?

९) एन.एस.बेंद्रे यांच्या तीन प्रसिद्ध चित्रांची नावे लिहा.

१०) चित्रकार वासुदेव गायतोंडे यांची प्रसिद्ध चित्रे कोणती ?

११) चित्रकार गायतोंडे यांच्या चित्रांवर कोणत्या पाश्चात्य कलाकारांच्या शैलीचा प्रभाव दिसतो ?

१२) कोणत्या कलाशैलीत काम करणारे कलावंत म्हणून श्री. वासुदेव गायतोंडे ओळखले जातात ?

१३) चित्रकार जिव्या सोमा म्हसे कोणती चित्रे काढण्यात प्रसिद्ध होते ?

१४) जिव्या सोमा म्हसे चित्र काढण्यासाठी कशाचा वापर करीत ?

१५) जिव्या सोमा म्हसे यांना सरकारने कोणता मोठा पुरस्कार देऊन सन्मानित केले ?

